# <u>प्रसिध्दी पत्रक</u>

आरोपी लोकसेवक - 1.श्री. निखील मुकुंद गायकवाड, वय 29 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद- कनिष्ठ लिपिक, मालमत्ता विभाग, महानगरपालिका औरंगाबाद(वर्ग-3) 2. श्री. शेख मोईनुद्दीन शेख नईम, वय 30 वर्षे, व्यवसाय - नौकरी, कनिष्ठ अभियंता, (कंत्राटी) मालमत्ता विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख 15,000/- रुपये स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिटी चौक, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | 1.श्री. निखील मुकुंद गायकवाड, वय 29 वर्षे, व्यवसाय-नौकरी, पद- कनिष्ठ लिपिक, मालमत्ता विभाग, महानगरपालिका औरंगाबाद(वर्ग-3)<br>2. श्री. शेख मोईनुद्दीन शेख नईम, वय 30 वर्षे, व्यवसाय - नौकरी, कनिष्ठ अभियंता, (कंत्राटी) मालमत्ता विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | 15000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 15,000/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती दिपाली निकम, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांना आधार केंद्रासाठी तात्पुरत्या स्वरुपात महानगरपालिकेची शासकीय जागा उपलब्ध करुन देण्यासाठी. आलोसे क्रमांक 1 यांच्या निर्देशान्वये आलोसे क्र.2 यांनी पंचांसमक्ष 15,000/- रुपये लाचेची मागणी केली व सदर लाच रक्कम आलोसे क्र. 1 यांनी आलोसे क्र. 2 यांचे उपस्थितीत पंचासमक्ष स्वत: स्विकारली. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांना आधार केंद्रासाठी तात्पुरत्या स्वरुपात महानगरपालिकेची शासकीय जागा उपलब्ध करुन देण्यासाठी आ.लो.से. श्री. निखील मुकुंद गायकवाड यांच्या निर्देशान्वये आलोसे श्री. शेख मोईनुद्दीन शेख नईम हे 15,000/- रुपये लाचेची मागणी तक्रारदार यांच्याकडे करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री. निखील मुकुंद गायकवाड यांच्या निर्देशान्वये आ.ला.ेसे. श्री. शेख मोईनुद्दीन शेख नईम यांनी पंचांसमक्ष 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. |

| | | |
|---|---|---|
| | | त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 06/04/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे श्री. निखील मुकुंद गायकवाड यांनी आ.लो.से. श्री. शेख मोईनुद्दीन शेख नईम, यांचे उपस्थितीत पंचासमक्ष स्वत: स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से. श्री. निखील मुकुंद गायकवाड व श्री. शेख मोईनुद्दीन शेख नईम यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे सिटी चौक औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिपाली निकम यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोना/ भिमराव जिवडे, पो.ना.सुनील पाटील, पोअं/ अशोक नागरगोजे, दत्ता होरकटे चालक पो.अ. चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

**(मारुती शंकर पंडित)**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.